बनावट संगणकीकृत मिळकत पत्रिका तयार होऊ नये यासाठी प्रतिबंधक उपाययोजना करण्याकरीता श्री. एस. चोक्कलिंगम् (भा.प्र.से.), जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक समिती-२०१८/प्र.क्र.७२/ल-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि.२७ फेब्रुवारी, २०१८

<u>प्रस्तावना</u> :

सन-२०१७ च्या विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात "अकोला शहरातील भूखंड, तालुका भूमिअभिलेख कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बळकाविल्याबाबत" या विषयावर उपस्थित झालेल्या विधानसभा तारांकित प्रश्न क्र.९५३७२ प्रश्नासंदर्भातील जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयाने सादर केलेल्या अहवालानुसार, अकोला येथील शिट नं.३७ बी, प्लॉट नं.१२१/१ व १२१/अ हे भुखंड शासनाच्या मालकीचे आहेत. तथापि, सदर मिळकतींबाबत संगणकात "१२१ पैकी" असा शब्दप्रयोग करुन गजराज गुडदमल मारवाडी या नावाची मूळ मिळकत पत्रिका अभिलेखात नसतांना संगणकावरती बनावटरित्या तयार करण्यात आली असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, मा. मंत्री (महसूल) यांनी दि.१५.१२.२०१७ रोजी सभागृहात, भविष्यात या प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, त्यास प्रतिबंध करण्याकरिता उपाययोजना करण्यासंदर्भात श्री. चोक्कलिंगम्, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येईल" असे आश्वासन दिले होते त्यानुषंगाने, सदरची समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

अकोला येथील शिट नं.३७ बी, प्लॉट नं.१२१/१ व १२१/अ येथील मिळकतीची बनावट संगणकीकृत मिळकत पत्रिका तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या कार्य पध्दतीचा (Modus Operandi) अभ्यास करणे व संगणकीकृत मिळकत पत्रिका तयार करणे / जतन करणे या बाबतच्या विद्यमान कार्यपध्दतीत असलेल्या त्रुटी शोधून काढणे तसेच राज्यात बनावट संगणकीकृत मिळकत पत्रिका तयार होऊ नये याबाबत प्रतिबंधक उपाययोजना सुचविणे याकरीता श्री. एस. चोक्कलिंगम् (भा.प्र.से), जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव व पदनाम	समितीतील पदनाम
१	श्री. एस. चोक्कलिंगम् (भा.प्र.से.), जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे	अध्यक्ष
२	जिल्हाधिकारी, अकोला	सदस्य
३	पोलीस अधीक्षक, अकोला	सदस्य
४	उप महानिदेशक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे	सदस्य
५	उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (नगर भूमापन), पुणे	सदस्य सचिव
६	उपसंचालक भूमि अभिलेख, अमरावती प्रदेश	सदस्य

२. सदर समितीने आपला अहवाल एक महिन्यात शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२७१६३१२३२३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Haridasrao Bhogle

Digitally signed by Santosh Haridasrao Bhogle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd6727259260b3d, cn=Santosh Haridasrao Bhogle
Date: 2018.02.27 16:31:47 +05'30'

(डॉ. संतोष भोगले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव / वि.का.अ. मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव / वि.का.अ. मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे
९. जिल्हाधिकारी, अकोला
१०. पोलीस अधीक्षक, अकोला
११. उप महानिदेशक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे
१२. उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (नगर भूमापन), पुणे
१३. उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे
१४. उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश / कोकण प्रदेश / नाशिक प्रदेश / औरंगाबाद प्रदेश / नागपूर प्रदेश / अमरावती प्रदेश
१५. सह सचिव (ई-४), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. उप सचिव (ल-१ / ई-५ / ज-९), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. जिल्हाअधीक्षक, भूमि अभिलेख, अकोला.
१८. निवडनस्ती, ल-१ कार्यासन